# शह-कटशह !काटा रूते कुणाला ?

MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
**आरंभ**
संपादक - दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -३५२ | शुक्रवार दि.१३ सप्टेंबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -352 | FRIDAY DT.13 SEPTEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## मुगगाव ग्रामपंचायत नरेगा कामात महाभ्रष्टाचार चौकशी करून कारवाई करावी माजी सरपंच संजय खोटे यांची जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार



पाटोदा (प्रतिनीधी)

पाटोदा तालुक्यातील मुगगाव ग्रामपंचायत अंतर्गत मोठ्या प्रमाणावर मग्रारोहयाचे कामे सुरू असुन ते कामे मजुराने न करता मशिनद्वारे केली जात असताना कामावर मजूरांच्या ग्रामसेवक व ग्रामरोजगार सेवक ऑनलाइन हजरी भरून घेतात कशी यांची लेखी तक्रार व निवेदन देऊन चौकशी करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी जिल्हाधिकारी बीड,मुख्य कार्यकारी अधिकारी बीड व गटविकास अधिकारी यांच्याकडे माजी सरपंच संजय खोटे यांनी केली आसुन सन २०१३ ते सन २०१७ पर्यंत तेरावा वित्त आयोगाअंतर्गत पवनचक्की कर तसेच केकानवस्ती अंतर्गत पाणीपुरवठा योजना, महादेव दरा पाईपलाईन इत्यादी कामे न करता पैसे उचलेले असल्याने मुगगाव ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या महाभ्रष्टाचाराची चौकशी करून कारवाई करण्यात यावी नसतात लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असा इशारा माजी सरपंच संजय खोटे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे

# बीड जिल्ह्यात शरद पवार देणार भाजपला मोठा दणका..!

## गेवराई चे विद्यमान आणि कार्यसम्राट आ. लक्ष्मण पवार वाजविणार तुतारी?

### कार्यालयावर रेखाटलेले पक्षाच्या चिन्हावर पेंट मारून झाकल्याने चर्चेला उधाण

**आमदार लक्ष्मण पवार हे खरंच पक्ष सोडून शरद पवार गटात जाणार का?**

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई : सध्या बीड जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. त्यासोबतच पक्षाच्या नेत्यांकडून बैठका, गाठीभेटीही पार पडताना दिसत आहेत. तसेच विधानसभेसाठी जुळवाजुळव सुरू करत आहेत. यामुळे राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार सध्या क्टिव्ह झाले आहेत. त्यांनी विधानसभा निवडणुकीसाठी रणनिती आखल्याचं दिसून येत आहे.**

अशातच आता गेवराई विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे विद्यमान आणि कार्यसम्राट आमदार लक्ष्मण पवार हे भाजपला सोडचिठ्ठी देत शरद पवार गटात जाणार असल्याची जोरदार चर्चा गेवराई मतदारसंघात रंगली आहे. यामुळे बीड जिल्ह्यात भाजपला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. तसेच विद्यमान आमदार लक्ष्मण पवार हे भाजपला रामराम करून



शरद पवार गटात जाऊन तुतारी वाजवणार असल्याचे बोलले जात आहे. तसेच त्यांच्या कार्यालयावर भाजपचे चिन्ह रेखाटलेले होते. त्यावर आता पेंट मारून झाकले आहे. यामुळे आमदार लक्ष्मण पवार हे तुतारी वाजविणार असल्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. लोकसभा निवडणुकीनंतर राजकीय समीकरणे बदलताना दिसत आहे. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजपला मोठा दणका बसणार असल्याचे दिसून येत आहे. यामुळे बीडच्या राजकीय वर्तुळात मोठी घडामोडी होणार आहे. आमदार लक्ष्मण पवार यांची कार्यसम्राट आमदार म्हणून बीड जिल्ह्यांसह महाराष्ट्रभर ओळख निर्माण आहे. त्यांच्या कार्यकाळात विकास कामे मजबूत झाले आहेत. विशेष म्हणजे रस्त्याच्या कामासाठी चांगला निधी आणून रस्ते केलेले आहे. मग विकास कामात क्टिव्ह असताना विद्यमान आमदार लक्ष्मण पवार हे भाजपला रामराम करून शरद पवार गटाचे का जाणार असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे. भाजपकडून विधानसभेची निवडणूक लढवून दोन वेळेस आमदार झाले आहेत. तर त्यांनी आपल्या कामातून मतदारसंघात जनतेच्या मनात स्थान निर्माण केले असल्याने त्यांनी तिथे स्थान निर्माण केले असल्याने त्यांनी मतदारसंघात मजबूत पकड आहे. ते भाजपला सोडचिठ्ठी देऊन गेले तर यात पक्षाचे नुकसान असल्याचे जनतेतून बोलले जात आहे. यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर हा भाजपला मोठा दणका असल्याचे बोलले जात आहे. आमदार लक्ष्मण पवार यांचे गेवराई मतदारसंघात मोठं प्रस्थ आहे. तसेच त्यांचा विकास कामात मोठा दबदबा आहे. त्यांनी भाजपला सोडले तर पक्षाचं मोठं नुकसान होणार असल्याचे जनतेतून बोलले जात आहे.

## श्री मंगलनाथ मल्टिस्टेट सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्काराने सन्मानित

### केंद्रीय सहकार सचिव डॉ. आशिष भूतानी यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण

दिनांक १२ सप्टेंबर २०२४ रोजी शिर्डी तेथे राष्ट्रीय फेडरेशन ऑफ मल्टिस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटीद्वारे २०२३ चा सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार श्री मंगलनाथ मल्टिस्टेट माजलगाव या संस्थेला प्राप्त झालेला आहे. शिर्डी येथे फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट च्या वतीने सहकार परिषदेचे आयोजन करण्यात आलेले होते.सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष फेडरेशन ऑफ मल्टिस्टेट चे अध्यक्ष श्री काकासाहेब कोयटे तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे केंद्रीय सहकार सचिव डॉ. आशिष भूतानी व राज्याचे माजी सहकार मंत्री श्री सुभाष देशमुख हे होते.तर प्रमुख उपस्थिती मध्ये बुलढाणा अर्बन चे विद्यमान अध्यक्ष श्री राधेश्यामजी चांडक हे होते...




फेडरेशन ऑफ मल्टिस्टेट हि संस्था सहकार चळवळीमध्ये आपले योगदान देणारे व शासनाने निर्गमित केलेल्या आदेशाचे पालन करून कार्य करणाऱ्या संस्थांचे मूल्यमापन करून संस्थांना पुरस्काराने सन्मानित करते. सुरक्षित व्यवसाय, सभासदांना वेळेत सुविधा व सुरक्षित कर्ज वाटपाच्या माध्यमातून सभासदांच्या ठेवींना सुरक्षा देणे या बाबींना प्राधान्य देत श्री मंगलनाथ मल्टीस्टेट ने एक आदर्श संस्था म्हणून नाव लौकिक केले आहे. सामाजिक,सांस्कृतिक व धार्मिक कार्यात सदैव सहभाग नोंदवून सामाजिक बांधिलकीला चालना देण्याचे काम संस्था सातत्याने करते.

या सर्व बाबीची दखल घेत राष्ट्रीय फेडरेशन ऑफ मल्टिस्टेट च्या वतीने संस्थेला २०२३ चा सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार प्रधान करण्यात आला. सदरील पुरस्कार संस्थेच्या वतीने व्यवस्थापकीय संचालक ड.रवींद्र कानडे,संस्थेचे सल्लागार वीर विनोद , जनरल मॅनेजर श्री अडेप राजेंद्र यांनी स्वीकारला.



बीड जिल्हा कोषागार कार्यालय प्रमुख श्री. गळगुंडे सर हे आज जिल्हा कोषागार अधिकारी पदी विराजमान झाल्या बद्दल त्यांचे स्वागत करताना संभाजी भैय्या सुर्वे . सूर्यकांत जायभाय सर, श्री. अशोक साखरे सर, मोहम्मद अझरुद्दीन उर्फ ए. एस. गोलू उपस्थीत होते.



उमेदवार कोणीही असो केज विधानसभेचा आमदार हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचाच असेल केज विधानसभेच्या नेत्या डॉ अंजली ताई घाडगे व माजी आमदार पृथ्वीराज साठे साहेब यांचा ठाम निश्चय तालुकाध्यक्ष अमर भैया देशमुख ठरणार किंगमेकर.



**प्रतिनिधी गेवराई ।आकाश सोनवणे**

**गेवराई तालुक्यातील ठाकर आडगाव येथील रहिवासी महेश मुरलीधर सोनवणे यांची रत्नागिरी जिल्हा परिषद शाळा येथे नियुक्ती झाल्याबद्दल महेश सोनवणे यांना सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.या वेळी शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित. पोलीस पाटील मधूकर कोकाट, चेअरमन संदिप कोकाट, समाजसेवक मारोती सोनवणे, मुरलीधर सोनवणे, भिमराज सोनवणे, ग्रामसेवक ऋद्रा घोलप, शालेय समिती अध्यक्ष महेश कोकाट, उपाध्यक्ष अंकुश सोनवणे, मुख्याध्यापक पवार सर, गिरी सर, गोटुळे सर, गोसावी सर, दादा पैलवान घोडेराव, ह.भ.प महाराज कैलास आनंदे, नवनाथ कोकाट,पापामिया शेख, समाधान सम्राट, समाधान सोनवणे,भगवान सोनवणे, मतेश सोनवणे, कांता खरात, रामा कोकाट, जितेंद्र खरात,गाजानन उनवणे, प्रकाश गाडे,निखील कोकाट,जेष्ठ नागरिक गावकरी मंडळ मित्र परिवार उपस्थित होता. यावेळी कार्यक्रमाचे आयोजन विकास सोनवणे यांनी केले होते.**

## राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडुन मा.नगराध्यक्ष शेख मंजुर यांना उमेदवारी देण्यात यावी - ॲड. मसिहोद्दिन इनामदार

### कॉंग्रेस आय पक्षाकडुन बीड जिल्हा सचिव इनामदार यांनी मांडली बाजु माजलगाव मतदारसंघात मुस्लिम समाजास द्यावी संधी.

माजलगाव (प्रतिनीधी)

नुकत्याच लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या आहेत. बीड जिल्ह्यामधुन मा. खा. बजरंगबप्पा सोणवने यांना तुतारी वाजवणारा माणुस या चीन्हावर संपुर्ण जिल्हातुन मुस्लीम समाजाने भरभरून मतदान दिले. माजलगाव शहरातुन कधी नव्हे तर या लोकसभेला ३६०० मताची लीड दिली. जिथे जिथे बहुसंख्येने मुस्लीम समाज आहे तिथे ९०%टक्के पेक्षा जास्त मते तुतारी वाजवणारा माणुस चिन्हास दिलेले आहेत. त्यामध्ये ,माजलगाव, धारुर, वडवणी, तालुक्यात व पात्रुड सर्कल, दिंदुड, , केसापुरी अशी अनेक गावे सांगता येतील, माजलगाव मतदार संघामध्ये मुस्लीम मतदार जवळपास



४५००० ते ५०००० च्या आसपास असुन हि मते निर्णायक आहेत. याचा फायदा निश्चितच शेख मंजुर यांना होऊ शकतो. पक्षफुटीनंतर अनेकजण आदरणीय पवार साहेबांना सोडुन गेले तरीही शेख मंजुर हे पवार साहेब यांच्या विचारावर प्रेम व्यक्त करत सोबत राहिले.. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची विचारधारा सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी प्रभावी प्रयत्न केले व माजलगाव मतदारसंघात हा पक्ष मजबूत करण्यासाठी आहोरात्र मेहनत करुन शेख मंजुर यांनी पवार साहेब यांच्याशी आपली निष्ठा कायम ठेवली आहे... निष्ठावंत शेख मंजुर यांनी माजलगाव शहरात घरोघरी जाऊन तुतारी वाजवणारा माणुस हे चिन्ह लोकांपर्यंत पोहचवले व लोकसभेला विविध रॅली

कॉर्नर सभा यातुन पक्षासोबत प्रामाणिक राहुन आपल्या कार्याची चुणूक दाखवून दिली. असे कॉंग्रेस आय चे बीड जिल्हासचिव

ॲड. मसिहोद्दिन इनामदार यांनी आपल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे... माजलगाव शहरात नगराध्यक्ष पदावर असतांना विवीध विकासकामे केली. प्रत्येक सामाजीक कार्यात स्वताः हुन सहभाग असतो. म्हनुन त्यांनी केलेल्या या सामाजिक कामांमुळे एक तरुण चेहरा मतदारसंघातही विकास करु शकतो त्यामुळे राष्ट्रवादी कॉग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवारी दिल्यास मुस्लीम समाज व बहुजन समाज सुध्दा त्यांच्या पाठीशी राहिल. व अल्पसंख्यांक समाजामधुन शेख मंजुर यांना उमेदवारी दिल्याने पक्षाकडुन जिल्ह्यामध्ये एक वेगळा संदेश जाईल व बीड जिल्ह्यातील महाविकास आघाडीच्या ईतर उमेदवारांना सोशल ईजिंनिअरिंग म्हनुन याचा

## राहुलजी गांधी यांना जिवे मारण्याची धमकी देणाऱ्या भाजपच्या तरविंदरसिंह मारवाह वर तत्काळ कारवाई करा - गणेश बजगुडे पाटील

बीड (प्रतिनीधी)

काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय नेते तथा लोकसभेचे विरोधी पक्षनेते सन्माननीय खासदार राहुलजी गांधी यांच्या दिल्ली येथील घरासमोर काल भारतीय जनता पक्षाचे नेते तथा माजी आमदार तरविंदरसिंह मरवाह यांनी जाहीरपणे राहुल गांधी बाज आजा, नही तो तेरा भी वही हाल होगा, जो तेरी दादी का हुवा अश्या स्वरूपाची जिवे मारण्याची धमकी दिली असुन अशा प्रकारे कोणत्याही व्यक्तीला जिवे मारण्याची धमकी देणे हा गंभीर गुन्हा असुन राहुल गांधी तर या देशाचे विरोधी पक्षनेते असुन घटनात्मक पदावर आहेत. तरी देखील अद्याप पर्यंत तरविंदरसिंह मारवाह याच्यावर कसल्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही याउलट यादेशाचे प्रधानमंत्री मा. नरेंद्र भाई मोदी व



### बीड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तीव्र निषेध

गृहमंत्री अमित भाई शाह यावर कुठलेही भाष्य नकरता तरविंदरसिंह मारवाह याला पाठीशी घालण्याचे काम करत आहेत. यासर्व प्रकरणाचा बीड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तीव्र निषेध करत त्याच्यावर तत्काळ कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी केली.

# राजकारणात सत्येंद्र पाटील सरांसारख्या निःस्वार्थी आणि कुशल संघटकाची आवश्यकता- डॉ. नरेंद्र पाटील

बीड (प्रतिनीधी)

प्रा. सत्येंद्र पाटील सरांचे विद्यार्थी दशेपासून आत्तापर्यंतचे संघटनात्मक कार्य उल्लेखनीय आहे. आजच्या काळात समाजकारणा सोबतच राजकारणामध्ये प्रा. सत्येंद्र पाटील यांच्या सारख्या निःस्वार्थी आणि कुशल संघटकाची आवश्यकता आहे. त्यांनी राजकारणात प्रवेश करावा आम्ही त्यांच्या पाठीशी पूर्ण ताकतीने राहू असे डॉ. नरेंद्र पाटील यांनी आंबेजोगाई येथील प्रा.सत्येंद्र पाटील यांचा कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेच्या वतीने सेवापुर्ती सन्मान सोहळा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना सांगितले. या वेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून अंबाजोगाईचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, मराठवाडा राष्ट्रवादी शिक्षक संघाचे अध्यक्ष कल्याणराव वाघमारे, प्रा.गोपीचंद सपाटे आदी उपस्थित होते. या बाबत अधिक माहिती अशी की, बीड शहरातील सौ के एस के महाविद्यालयातील प्रा. सत्येंद्र पाटील सर नुकतेच सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त काल गुरुवार दि.१२ सप्टेंबर रोजी आंबेजोगाई तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेच्या वतीने यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात सेवापूर्ती सन्मान सोहळा आयोजित केला होता. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रा.शैलेश जाधव,सचिव तसेच संघटक प्रा.अबेद सर यांच्यासह अनेक मान्यवरांनी प्रा. सत्येंद्र पाटील यांच्या बद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी जुक्ता संघटनेचे तालुका अध्यक्ष प्रा. डॉ. राजकुमार जेवरिकर यांनी आपल्या




मनोगतात प्रा. सत्येंद्र पाटील सर यांनी केलेल्या कार्याचा गुणगौरव करून भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या, श्री. राजकिशोर मोदी यांनी प्राध्यापक सत्येंद्र पाटील यांच्या संघटनात्मक व सामाजिक कार्याचा उल्लेख करून अंबाजोगाईला कॉलेजच्या निवडणुकीत पाटील यांना आम्ही निवडून आणल्याचे सांगत आमची विद्यार्थीदशे पासुनची मैत्री असल्याचे सांगितले. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ श्री. नरेंद्र काळे उपस्थितांना संबोधित करताना म्हणाले की, सत्येंद्र पाटील सरांनी विद्यार्थी दशेपासून आत्तापर्यंत समाजात एक मजबूत संघटन निर्माण केले आहे. त्यांचे संघटन कौशल्य राजकारणासाठी मोठे फायदेशीर ठरणारे आहे. प्रा. सत्येंद्र पाटील हे सर हे प्रामाणिक साधे, सरळ आणि निःस्वार्थी आहेत. एकंदरीतच प्राध्यापक सत्येंद्र पाटील सर सर्व गुणसंपन्न दिलदार व्यक्तिमत्व असलेले हरहुन्नरी अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे आहेत. त्यांच्या या अष्टपैलू व्यक्तिमत्वाची आणि संघटन कौशल्याची राजकारणाला योग्य दिशा देणारी आहे. त्यामुळे आता प्रा. सत्येंद्र पाटील सरांनी राजकारणा मध्ये सक्रिय होणे गरजेचे आहे. त्यांनी आता कसलाही विचार न करता राजकीय संघटनेत सक्रिय व्हावे. आम्ही त्यांच्या पाठीशी पूर्ण ताकतीने उभे राहू असे सांगितले. या सत्काराला उत्तर देताना प्रा. सत्येंद्र पाटील यांनी संघटनेचे आभार व्यक्त करून संघटनेचे अनेक प्रश्न असून ते प्रश्न पुर्णत्वास नेण्यासाठी आजपर्यंत काम केले त्याच प्रमाणेच अत्यंत प्रामाणिकपणे या पुढे ही काम करणार असल्याची ग्वाही देऊन आपण संघटित राहीलो तरच आपले प्रश्न सुटतील त्यामुळे संघटित राहण्याचा सल्ला सभासदांना दिला.

या कार्यक्रमास उप प्राचार्य पि.के जाधव सर उपप्राचार्य सुनील लोमटे, प्रा. लिमकर सर, प्रा. श्रीराम शेप ,प्रा.राजकुमार थोरात, प्रा. विजय चंन्ने , प्रा.सय्यद नासेर, प्रा.प्रीतम पन्हाळे,प्रा. इर्शाद अन्सारी, प्रा.प्रदीप तरकासे, प्रा.रमेश भोसले, प्रा. दिगंबर मुडेगांवकर , प्रा.विजय डोंगरे सर तसेच संघटनेचे अनेक सभासद हजर होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सचिन कराड सरांनी केले.

# धनंजय मुंडेंच्या नाथ प्रतिष्ठान आयोजित श्री वैद्यनाथ गणेश महोत्सवास परळीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**ना.धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान आयोजित श्री वैद्यनाथ गणेश महोत्सवात आज आग्रा येथील 'इंडियाज गॉट टॅलेंट' फेम क्रेझी हॉपर्स ग्रुप च्या कलाकारांनी शिव तांडव, छत्रपती शिवाजी महाराज यांचा राजदरबार, गणेश वंदना यांसह विविध संगीत नाट्य सादर करून उपस्थितांच्या अंगावर अक्षरशः शहारे आणले...**

परळी (प्रतिनीधी)

ना धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने परळी वैद्यनाथ शहरात आयोजित करण्यात आलेल्या श्री वैद्यनाथ गणेश महोत्सवात आग्रा येथील इंडियाज गॉट टॅलेंट फेम क्रेझी हॉपर्स ग्रुपने चित्त थरारक कलाकृतींच्या माध्यमातून छत्रपती शिवरायांचा राज दरबार साकारला. लहान मुलांपासून तरुणांपर्यंत अशा ४० कलाकारांच्या चिमूणे शिवतांडव गणेश पूजन असे डोळ्यांचे पारणे फेडणाऱ्या कलाकृती साकारल्या. धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली व ज्येष्ठ नेते वाल्मीक अण्णा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या गणेश महोत्सवास परळीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळत आहे.

गुरुवारी सायंकाळी संपन्न झालेल्या

**आग्र्याच्या क्रेझी हॉपर्स ग्रुपने साकारले छत्रपती शिवराय; चित्तथरारक कलाकृतीने डोळ्यांचे फेडले पारणे**

**मराठी तारका हिंदवी पाटील, प्राजक्ता गायकवाड यांचीही हजेरी**

सांस्कृतिक कार्यक्रमात क्रेझी होपर्स ग्रुपच्या कलाकृतीसह मराठी तारका हिंदवी पाटील, प्राजक्ता गायकवाड यांनीही हजेरी लावत महाराष्ट्राची लोकधारा प्रस्तुत केली.तत्पूर्वी परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या हस्ते श्रींची आरती करण्यात आली. कार्यक्रमाच्या अखेरीस नाथ प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते आलेल्या सर्व कलाकारांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

# जिल्हा रुग्णालयातील टपोरीगिरी कधी थांबणार? –शेख सलमान

बीड (प्रतिनीधी)

जिल्हा रुग्णालयातील दररोज येणारे शेकडो रुग्ण व त्यांच्यासोबत येणाऱ्या नातेवाईक असतात मात्र येथील काही टपोरी गिरी करणाऱ्या लोकांकडून महिलांची छेडछाड केली जात असल्याची तक्रारी वाढल्या असून हे टपरी गिरी कधी थांबणार असा प्रश्न शेख सलमान यांनी प्रसिद्धी पत्रकार द्वारे उपस्थित केला आहे. बीड जिल्हा रुग्णालयात दररोज हजारो रुग्ण उपचार घेत आहेत रुग्णासोबत हजारो नातेवाईक देखील जिल्हा रुग्णालयात ये जा करत आहेत तसेच गाव किंवा खेड्यापाड्यातून येणाऱ्या रुग्णांची संख्या देखील मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे येथील समाजसेवकाच्या

**समाज सेवेच्या नावाखाली महिलांना छेडछाड करण्याच्या तक्रारी वावाढल्या !**




नावाखाली टपोरीगिरी करणार्यांची संख्या मोठ्याप्रमाणावर पाहण्यास मिळत आहे. या टपोरी गिरी करणाऱ्यांना पोलिसांनी झोडपून काढावे अशी मागणी जिल्हा रुग्णालयातील नातेवाईकांच्या वतीने करण्यात येत आहे .जिल्हा रुग्णालयात उपचार घेण्यासाठी शेकडो महीला येत असतात महिलांना बघताच येथील समाजसेवा च्या नावाखाली उभे असलेल्या टपोरी गिरी करणाऱ्याला समाजसेवेचा पुळका सुटतोय आणि लगेच तो त

# मुख्याधिकारी नीता अंधारे मॅडम आमरण उपोषण करते महादेव गायकवाड यांचा जीव वाचवा:पँथर नितीन सोनवणे

बीड (प्रतिनीधी)

शहरामध्ये नगर परिषदेच्या समोर दिनांक ०९/०९/२०२४ रोजी पासून महादेव शामराव गायकवाड हे आमरण उपोषण करत आहेत आज ४ दिवस झाले तरीसुद्धा कुठल्याही शासकीय अधिकाऱ्याने येऊन त्यांचं आंदोलन सोडलेलं नाही.. आज ऑल इंडिया पँथर सेनेच्या सर्व टीमला सोबत घेऊन नगरपरिषद या ठिकाणी आमरण उपोषणाला बसलेले आंदोलन करते त्यांची भेट घेऊन संघटनेच्या माध्यमातून त्यांना पाठिंबा दिला व सीओ निता अंधारे मॅडम यांना फोन केला असता त्यांचा मोबाईल स्विच ऑफ आहे..




आंदोलनकर्त्यांचे वडील शामराव मारुती गायकवाड यांनी द्वारकादास मंत्री बँकेकडून ४०००० रुपये कर्ज घेतले होते ते सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या उत्पादन व इतर रकमेतून ७५५३० रुपये नगर परिषदेने २००३ साली ला कपात करून घेतले पण वसुली अधिकारी मोरे यांच्या सांगण्यावरून तब्बल पाच वर्ष द्वारकादास मंत्री बँकेला पाठवले नाही त्यामुळे आज ३०७००० रुपये बाकी राहिली म्हणून त्यांचे डइख खाते होल्ड केले आहे त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे या बँकेस व नगरपरिषदेला विचारणा केली असता उडवाउडचे उत्तर देत असून ही बाब गंभीर आहे त्यामुळे त्यांनी हे आमरण उपोषण केले आहे जोपर्यंत नगरपालिका व बँक या बाबतीत काही ठोस निर्णय घेत नाही तोपर्यंत उपोषण चालू राहील असं उपोषणकर्त्यांनी सांगितलं आहे.

आंदोलनाच्या काळात त्यांच्या जीवदास काही धोका झाल्यास नगरपरिषद प्रशासन जबाबदार राहील. ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने सीओनिता अंधारे यांना विनंती करत आहोत तात्काळ लेखी स्वरूपाचं लेटर देऊन आंदोलन थांबवा व आंदोलन कर्त्याचा जीव वाचवा अन्यथा पँथरच्या वतीने व आंदोलनकर्त्यांना सोबत घेऊन नीता अंधारे यांच्या तोंडाला काळे फासले जाईल. असा इशारा नितीन सोनवणे जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना, तालुकाध्यक्ष कावेरी जाधव, तालुका उपाध्यक्ष निसार शेख, युवा शहराध्यक्ष अविनाश वाडमारे, उमेश तारीख सोशल मी शहराध्यक्ष, मिश्रीलाल जंगडा शहर सचिव, सोनी जंगडा सचिव शहर, दीक्षा मीरपगार शहर उपाध्यक्ष, पापा भाई तालुका सचिव, रोहित सोनवणे व इतर कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते..

# राज्य पुरस्कृत सोयाबीन व कॉटन मूल्य साखळी उत्पादकता वाढ अभियान अंतर्गत फवाऱ्याचे वाटप

**प्रतिनिधी ।शिरूर**

**राज्य शासनाने शेतकऱ्यांकरिता सोयाबीन व कापूस फवारणी करिता पूर्ण राज्यभरातून फवाऱ्याचा लकी ड्रॉ ठेवला होता.यामध्ये शिरूर तालुक्यातून हजारोच्या संख्येने ऑनलाइन अर्ज दाखल केले होते.दोन दिवसापूर्वी ऑनलाइन लकी ड्रॉ काढण्यात आला.यामध्ये शिरूर तालुक्यात जवळपास सातशेच्या आसपास शेतकऱ्यांचे फवाऱ्यासाठी नाव आले आहे.**

यावेळी फवारे नेण्यासाठी तालुक्यातून शेतकऱ्यांनी कृषी

**फवारा घेण्यासाठी शेतकऱ्यांची एकच गर्दी**

कार्यालयामध्ये एकच गर्दी केलेली पाहायला मिळाली.राज्य पुरस्कृत सोयाबीन व कॉटन मूल्य साखळी उत्पादकता वाढ अभियान अंतर्गत गेल्या दोन अडीच महिन्यापासून ऑनलाईन अर्ज भरण्यात येत होते.यावेळी शिरूरसह जवळपास ४३ गावांनी ऑनलाइन अर्ज केले होते.दोन दिवसापूर्वी याचा लकी ड्रॉ घेण्यात आला.यामध्ये ७०० च्या वर शेतकऱ्यांचे लकी ड्रॉ मध्ये नाव आले आहे. लागलीच दुसऱ्या दिवशी म्हणजेच गुरुवारी फवाऱ्याचे वाटप करण्यात आले.यावेळी शेतकऱ्यांनी फवारा नेण्यासाठी एकच गर्दी केली होती.यामध्ये काही गावांतील शेतकऱ्यांचे अर्ज जास्त असतानाही त्या गावातील नावे तुरळक प्रमाणात आले आहेत तर काही गावांमधील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नावे आले आहेत.यामुळे काही प्रमाणात शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे. ही सगळी प्रक्रिया ऑनलाइन आहे याचा लकी ड्रॉ ऑनलाइन पद्धतीने पुण्यामध्ये घेण्यात आला असल्याचे तालुका कृषी अधिकारी नेटके यांनी सांगितले आहे.



बीड - येथील सन आनंदाचा, सन उत्सवाचा, सन संस्कृतीचा, सन प्रेमाचा, सन गौरी गणपतीचा, आणि ह्या सनानिमित् तेजस्विनी ग्रुप मधील महीलांच्या घरातील विविध प्रकारे नटलेल्या, सामाजिक संदेश, देणाऱ्या, प्रेमभाव जपणाऱ्या गौराई

# समाज प्रबोधनासाठी किर्तनाची गरज आहे - महंत शिवाजी महाराज

नवगण राजुरी (प्रतिनीधी)

जीवनात बदल घडविण्यासाठी अखंड हरिनाम सप्ताह असून समाज प्रबोधनासाठी किर्तनाची गरज असून हरिकिर्तन ऐकण्याची भारतीय संस्कृती आहे असे प्रतिपादन श्रीक्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांनी केले. नवगण राजुरी येथे गणेश जन्मोत्सवा निमित्त आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता गुरुवारी श्री क्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती ह.भ.प. प्रेममूर्ती महंत शिवाजी महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली. यावेळी आचार्य अमृताश्रम स्वामी महाराज, मंगलमूर्ती देवस्थानचे अध्यक्ष रवींद्र क्षीरसागर, डॉ.योगेश क्षीरसागर, युवा नेते हेमंत क्षीरसागर, यांची प्रमुख उपस्थिती होती.



किर्तन सांगताना महंत शिवाजी महाराज म्हणाले की, भगवंतांनी विश्वसृष्टी निर्माण केली असून ज्याची-त्याची सोय लावली आहे. आजच्या काळात माणूस जवळच्याला तर विसरलाच आहे परंतु देवाला पण विसरला आहे. संतांनी तपश्चर्या केल्यामुळे पंढरपूरचा विठोबा श्री क्षेत्र नारायणगडला आला. आज काला आहे काला म्हणजे परमार्थातला पगारचा दिवस आहे. नवगण राजुरी गाव सर्व क्षेत्रात नंबर एक वर आहे. या सप्ताहात मोठ मोठ्या किर्तनकारांनी येऊन किर्तन सेवा केली. भगवंताचे चिंतन केल्या नंतर चिंता करण्याची गरज नाही व्यवहारातलं नातं टिकत नाही परंतु परमार्थातलं नातं टिकतं. महिला मंडळाचा परमार्थात सिंहाचा वाटा आहे. विश्व सृष्टी निर्माण करणारा भगवंत आहे. मुला-मुलींनी आपल्या आईला आई म्हणावे आईचे थोर उपकार आहेत आई म्हणजे प्रेमाचा सागर आहे, आई-वडिलांची सेवा करा आई-वडील हेच तुमच्यासाठी देव आहेत ते तुम्हाला आशीर्वाद देतील आई-वडिलांचे उपकार जाणा. भक्तीची खात्री भक्ताला असावी अशी भक्ती असावी, शिष्याने गुरुची सेवा इमानदारीने करावी, काय करावे आणि काय करू नये यासाठी हा भक्तीचा मंडप आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी परिसरातील भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# बीड जिल्हा शिवसेनेचा बालेकिल्ला करण्यासाठी शिवसैनिकांनी कामाला लागावे-विरोधी पक्षनेते अंबादास दानवे

## शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी शिवसैनिकांनी सज्ज राहावे...माजी मंत्री बदामराव पंडीत..

निष्ठावंत शिवसैनिक हीच खरी शिवसेनेची ताकद...शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते

शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धवजी बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने व महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दादा दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत,युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे,आमदार तथा मराठवाडा संपर्क नेते सुनीलजी प्रभू साहेब, उपनेत्या सुषमाताई अंधारे, मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरूरकर साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव सहसंपर्कप्रमुख डॉ. लक्षराज सानप,सह संपर्क प्रमुख बाळासाहेबजी अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली आज बीड शहरातील हॉटेल ग्रँण्ड यशोदा येथे महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्ष नेते तथा शिवसेनेचे मराठवाडा विभागीय नेते माननीय अंबादास जी दानवे साहेब यांच्या प्रमुख अध्यक्षतेखाली व माजी मंत्री तथा बीड जिल्ह्याचे सहसंपर्कप्रमुख बदामराव आबा पंडित, लोकसभा प्रमुख सुनील दादा धांडे, जिल्हा परिषद चे माजी सभापती युद्धजीत दादा पंडित, जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर,जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर, जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्हा शिवसेना पदाधिकार्यांची आढावा बैठक संपन्न झाली.

याप्रसंगी अंबादास दानवे साहेबांनी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीपूर्वी पक्षाची संघटनात्मक बांधणी, बूथ प्रमुख, गटप्रमुख, शाखा प्रमुखांची प्रत्येक तालुक्याच्या तालुखांशी संवाद साधून आष्टी व माजलगाव विधानसभेमधील सर्व तालुक्यांचा उपजिल्हाप्रमुख ,तालुका प्रमुख,शहर प्रमुख यांच्याकडून आढावा घेतला व सर्व शिवसेना पदाधिकाऱ्यांना व शिवसैनिकांना मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना दानवे साहेब असे म्हणाले की बीड जिल्ह्यातील शिवसेना मजबूत आणि बळकट करण्यासाठी सर्व पदाधिकारी शिवसैनिक यांनी बुथ शाखा बांधणे बसून पूर्ण संघटनात्मक बांधणी करून ज्या ज्या ठिकाणी पदाधिकारी रिक्त असतील त्या त्या ठिकाणी नवीन पदाधिकाऱ्यांच्या नेमणुका



करून पक्ष संघटन वाढविण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन महिला आघाडी युवासेना शेतकरी सेना या सर्वांच्या माध्यमातून येणाऱ्या काळामध्ये बीड जिल्ह्यामध्ये शिवसेनेची ताकद वाढविण्यासाठी सर्वांनी निष्ठेने आणि प्रमाणिकपणे काम करावे असे प्रतिपादन केले..

शिवसेनेचे पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांना अभिप्रेत असलेले शिवसेनेची संघटना बांधणी आपल्या बीड जिल्ह्यामधून व्हावी हा बीड जिल्हा शेतकरी कष्टकरी व ऊसतोड मजुराचा असून या जिल्ह्याने अनेक दिग्गजांचा पराभव करून सर्वसामान्य लोकांना आमदार खासदार करण्याचे काम केलेला या जिल्ह्याचा इतिहास आहे आणि म्हणून येणाऱ्या काळामध्ये शिवसेनेला जास्तीत जास्त जागा सोडून घेऊन शिवसेनेचा भगवा फडकण्यासाठी शिवसैनिकांनी सज्ज राहावे असे मत या प्रसंगी व्यक्त केले.

शिवसेनेचे सह संपर्कप्रमुख तथा माजी मंत्री बदामराव आबा पंडीत यांनी आपल्या भाषणातून बीड जिल्ह्यात शिवसेना पक्षाची ताकद वाढविण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे आसे आव्हान केले.तसेच यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी प्रास्ताविक पर मनोगत व्यक्त करताना बीड जिल्हा शिवसेनेसाठी तीन विधानसभा मतदारसंघ सोडवून घ्यावे त्याचप्रमाणे शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांना अभिप्रेत आसणारे कार्य आम्ही निष्ठेने व प्रमाणीकपणे करून शिवसेना पक्ष संघटना वाढीसाठी आम्ही सर्वांना सोबत घेऊन बीड जिल्हा भगवामय करू असे प्रतिपादन केले.सर्व तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी व शिवसैनिकांनी जोमाने कामाला लागावे असे पदाधिकारी यांना मागदर्शन केले.सुत्रसंचलन तालुका प्रमुख गोरख आण्णा सिंघण यांनी केले तर आभार प्रदर्शन उपजिल्हाप्रमुख हनुमान जिजा जगताप यांनी केले..

याप्रसंगी उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर, उपजिल्हाप्रमुख रामराजे सोळुंके, उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महूवाले, उपजिल्हाप्रमुख आशिष मस्के, उपजिल्हाप्रमुख बंडू पिंगळे,दिपक मोराले, नारायण सातपुते, शहर प्रमुख शेख निजाम भाई,विधानसभा प्रमुख नवनाथ अटूळे,विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, जिल्हा संघटक नितीन भैय्या धांडे, वडवणी तालुकाप्रमुख विनायक बप्पा मुळे, शिरूर तालुका प्रमुख सोपान काका मोरे, आष्टी तालुका प्रमुख सुभाष राऊत, पाटोदा तालुका प्रमुख मुकुंद शिंदे, धारूर तालुका प्रमुख बाबा सराफ, माजलगाव तालुका प्रमुख प्रभाकर धरपडे, गेवराई तालुकाप्रमुख अजय भैय्या दाभाडे,अंबाजोगाई तालुकाप्रमुख बाळासाहेब शेप, परळी तालुका प्रमुख भोजराज पालीवाल, माजलगाव शहर प्रमुख दत्ता रांजवण सह शिवसेनेचे सर्व पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने बैठकीस उपस्थित होते....!!

## तांदळवाडी येथील अष्टविनायक गणेश मंडळाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर संपन्न

किल्लेधारुर / प्रतिनिधी

तालुक्यातील तांदळवाडी येथे अष्टविनायक गणेश मंडळाच्या वतीने गेल्या दोन दिवसांपासून सामाजिक उपक्रम राबवत गणेश उत्सव साजरा केला जात आहे त्यात काल दि.१२ सप्टेंबर रोजी रक्तदान शिबिराचे ही आयोजन करण्यात आले होते या रक्तदान शिबिरात ३५ रक्तदात्यांनी रक्तदान केले आहे.

अष्टविनायक गणेश मंडळ तांदूळवाडी येथे गणेश उत्सवाच्या निमित्ताने सामाजिक कार्यक्रम घेतले जात असतात त्यात संगीत खुर्ची,खुल्या रांगोळी स्पर्धा,जागर लोककलेचा,महिलांचे आरोग्य शिबिर अशा अनेक विविध कार्यक्रमाचे आयोजन तांदूळवाडी या ठिकाणच्या अष्टविनायक गणेश मंडळाच्या वतीने केले जात असतात काल दिनांक १२ सप्टेंबर रोजी




रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या रक्तदान शिबिरात ३५ गणेश भक्तांनी रक्तदान केले या रक्तदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक डॉक्टर मयूर सावंत, डॉक्टर निलेश उमाप,सौ राधा चिरके,ज्येष्ठ पत्रकार अनिल महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती यांच्यासह गावातील नागरिक व अष्टविनायक गणेश मंडळाचे अध्यक्ष उपाध्यक्ष व सर्व सदस्य यांच्यासह नागरिकांची उपस्थिती होती.

## क्रीडा विभागाच्या वतीने आवरगाव येथे तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा संपन्न

### १४,१७,१९ वयोगटातील ६ संघ प्रथम ;आदर्श ग्रामपंचायत आवरगाव च्या वतीने प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मान

किल्लेधारुर /प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचनालय पुणे यांच्या वतीने शासकीय शालेय तालुका स्तरावरील कबड्डी क्रीडा स्पर्धा २०२४-२५ चे आयोजन धारूर तालुक्यातील आदर्श आवरगाव या ठिकाणी करण्यात आले होते या कबड्डी स्पर्धेत १४.१७.१९ वर्ष वयोगटातील मुला मुलींचे एकून ४३ संघ सहभागी झाले होते.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे यांच्या अंतर्गत शासकीय शालेय तालुका स्तरावरील क्रीडा स्पर्धा २०२४ २५ चे आयोजन दिनांक १२ सप्टेंबर रोजी धारूर तालुक्यातील आवरगाव या ठिकाणी करण्यात आले होते यात तालुक्यातील कबड्डी स्पर्धेत १४.१७.१९ वर्ष वयोगटातील मुला मुलींचे एकून ४३ संघ सहभागी झाले होते. या कबड्डी स्पर्धेच्या उद्घाटनासाठी उद्घाटक म्हणून धारूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे कार्यक्रमाचे अध्यक्ष



आवरगावचे आदर्श सरपंच अमोल जगताप ,ज्येष्ठ पत्रकार अनिलजी महाजन, यांच्यासह पंचक्रोशीतून सर्व सरपंच नागरिक यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री लहूकुमार गव्हाणे सर तालुका क्रीडा संयोजक यांनी केले तर सूत्रसंचलन मुंजाराम निरडे सर सर यांनी केले तर पंच म्हणून काळे सर,शिनगारे राम सर,चव्हाण सर ,वैरागे सर ,मनोज गव्हाणे सर, साळुंखे सर,मुंडे सर, समुद्रे सर,गायकवाड सर,राऊत सर,यांनी विशेष परिश्रम घेतले.

१४.१७.१९ वयोगटातील मुलामुलींच्या ४३संघांपैकी ६ संघ प्रथम आले आहेत त्यात.१४ वर्ष मुलांच्या गटात प्रथम जिजामाता विद्यालय तेलगाव,१४ वर्ष मुलींच्या गटात नाथकृपा माध्यमिक विद्यालय कासारी बोडखा, १७ वर्षीय मुलांच्या गटात प्रथम न्यू हायस्कूल कारी, १७ वर्षीय मुलींच्या गटात प्रथम वसुंधरा माध्यमिक विद्यालय कोळपिंपरी, १९ वर्षीय मुलांच्या गटात प्रथम राजमाता जिजाऊ महाविद्यालय धारूर,व १९ वर्षीय मुलींच्या गटात प्रथम राजमाता जिजाऊ महाविद्यालय धारूर या गटांनी प्रथम क्रमांक मिळवला आहे त्याबद्दल त्यांचे मातृभूमी सार्वजनिक गणेश मंडळ व आदर्श ग्रामपंचायत आवरगाव यांच्या वतीने प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन अभिनंदन केले.

## एक गाव एक गणपती लोकचळवळ झाली पाहिजे - राजेंद्र मस्के

### लिंबागणेश मयुरेश्वर गणेश विसर्जन मिरवणुकीत राजेंद्र मस्केंनी घेतला सहभाग ...!

बीड (प्रतिनीधी)

एक गाव एक गणपती सर्वार्थाने उपयुक्त अनोखी परंपरा आहे. हि संकल्पना प्रत्येक गावोगावी रूढ झाली पाहिजे. यामुळे एकता निर्माण होईल. भक्ती आणि शक्तीचे सामाजिक दर्शन विराट होईल. लिंबागणेश येथील सुमारे अडीचशे वर्षाची परंपरा परंतु आजही एकोपा आणि भक्ती ओसंडून वाहते. अबाल वृद्ध अगदी उत्साहात सहभागी होतात. गाव एकोप्याची मिरवणूक आनंदी व जल्लोषाची असते. हा आनंद करोडो गणेश भक्तांना मिळावा यासाठी ग्रामस्थ मंडळी एक गाव एक गणपती लोकचळवळ झाली पाहिजे. असे विचार भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी लिंबागणेश येथील एक गाव एक गणपती संकल्पनेतील गणरायाच्या विसर्जन मिरवणुकी दरम्यान मांडले.



बीड विधानसभा मतदार संघातील लिंबागणेश गणेश उत्सवानिमित्त मयुरेश्वर श्री गणेशाची स्थापना करून, पाचव्या दिवशी मूर्तीचे विसर्जन करतात. उत्सवाची मूर्ती पर्यावरण पूर्वक असते. उत्सवमूर्ती गावातील स्वर्गीय माणिकराव कानीटकर यांचे घराणे वंश परंपरेनुसार बनवत आले आहेत. उत्सवासाठी मूर्ती विकत न घेता. स्वत: बनवलेली मूर्ती उत्सवासाठी वापरतात. लिंबागणेश गणेश भक्तांची ही परंपरा स्तुत्य असून, अनुकरणीय आहे. लिंबागणेश येथील भालचंद्र गणपती देवस्थानमुळे लिंबागणेश गावाला अध्यात्मिक ख्याती लाभलेली आहे. पाचव्या दिवशी विसर्जनाची परंपरा कायम राखत, आज दुपारी सामुदायिक आरती करून, सरकार वाड्या पासून भव्य विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ झाला. या भव्य मिरवणुकीत राजेंद्र मस्के यांनी सहभाग घेतला. श्री मयुरेश्वर गणेशाचे दर्शन घेऊन, पालखीला खांदा दिला. लेजीम खेळत आनंद लुटला. या मिरवणुकीसाठी लिंबागणेश परिसरातील हजारो भाविक गुलालाची उधळण करत आणि गणपती बाप्पा मोरयाचा गजर करत मयुरेश्वर गणेशाला निरोप देतात. यानिमित्ताने लिंबागणेश गावात यात्रेचे स्वरूप आले आहे.

## व्यसनाच्या आहारी न जाता सृदृढ जिवन जगा- हभप संग्राम (बापू)भंडारे

आष्टी (प्रतिनीधी)

अलिकडच्या काळात तरूण मोठ्या प्रमाणावर व्यसनाच्या आहारी जात असल्याने शारिरीक व्याधीसह तरूण वयातच आयुष्य गमवून बसत आहेत.त्यामुळे व्यसनाच्या आहारी न जाता सृदृढ जिवन जगून समाजात सामाजिक सलोखा राखला जावा यासाठी सर्वांनी गुण्यागोंविदाने राहायला हवे असे प्रतिपादन हभप.संग्राम (बापू) भंडारे यानी केले.आष्टी तालुक्यातील सांगवी(पाटण) येथील लोकनियुक्त सरपंच दत्तात्रय (आबा) खोटे याच्या अभीष्टचिंतन सोहळ्याचे गूरूवारी आयोजन करण्यात



**सांगवी पाटणचे आदर्श सरपंच दत्तात्रय खोटे याचा वाढदिवस विविध उपक्रमाने साजरा**

आले होते.यावेळी किर्तन रूपी सेवे प्रसंगी हभप भंडारे महाराजांनी केले. शालेय साहित्याच्या वाटपासह वृक्षारोपण सांगवी गावातील दोन्ही शाळेतील विद्यार्थाना शालेय साहित्य वाटप करून शाळा व गाव परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. गावासह पै पाहुण्यांना जेवण अभिष्टचिंतनाच्या निमित्ताने गावासह,परिसरातून व बाहेर गावावरून आलेल्या पै पाहुण्यांसाठी जेवाणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जि.प.अध्यक्षा सौ.सविताताई गोल्हार,सरपंच परिषेदेचे राज्याध्यक्ष दत्ताभाऊ काकडे,जयदत्त भैय्या धस, सामाजिक कार्यकर्ते संदिप खाकाळ,उद्योजक पांडुरंग सोनवणे,सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक बाबासाहेब चव्हाण,शिवक्रांती सेनेचे युवक प्रदेश अध्यक्ष दिपक दादा सोनवणे,ह.भ.प.प्रा.विजय राजपुरे,सरपंच दादासाहेब जगताप, डॉ.युवराज तरटे,संतोष मेहेत्रे, जाकीर शेख,ह.भ.प.देवीदास गर्जे, सतिश ढवळे,शरद कुमखाले,पत्रकार नितीन कांबळे,प्रा.संजय खंडागळे,सुरेश कांबळे,दादा पवळ,समीर शेख याच्यावर अनेक मान्यवर उपस्थित होते.

## विजेच्या खांबाला चिटकून चोरांबा येथील शेतकऱ्याच्या दोन गायीचा मृत्यु

किल्लेधारूर (प्रतिनीधी)

तालूक्यातील चोराबा येथील शेतकरी राजाभाऊ देवीदास ईरमले याच्या दोन गायीचे आरणवाडी घागरवाडा गावठाणात विजेच्या खांबाला करंट लागून गुरूवारी सकाळी जागेवर मृत्यु झाला. या शेतक-याला महावितरणे नुकसान भरपाई दयावी आशी मागणी होत आहे. चोराबा येथील शेतकरी राजाभाऊ ईरमले यांच्यख दोन गायी गुरूवार दि १२ संप्टेबर रोजी सकाळी आरणवाडी घागरवाडा येथील गाव ठाणात चालत असताना विजेच्या खाबाला तिटकल्या करंट लागून जागीच त्याचा मृत्यू झाला यामुळे या शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे या शेतकऱ्याला महावितरणे तात्काळ नुकसान भरपाई द्यावी आशी मागणी महावितरण कडे करण्यात आली आहे





आष्टी तालुक्यातील गितेवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक सोपान वायभासे सर यांना आदर्श शिक्षक राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला त्यावेळी गावातील सामाजिक राजकीय क्षेत्रातील मान्यवर यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला
छायाचित्र सुरेश कांबळे

# विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची बदामराव पंडितांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

गेवराई (प्रतिनीधी)

विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले असून शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी मतदारसंघात दौरा करून पदाधिकाऱ्यांची एकजूट बांधली आहे. याच पार्श्वभूमीवर विधान परिषद विरोधी पक्षनेते तथा शिवसेना नेते आ अंबादास दानवे यांनी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देऊन चर्चा केली आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे नेते आणि शिवसेना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी सर्व जिल्हा परिषद सर्कल मध्ये झंजावती दौरा करून शिवसेना पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या बैठका घेतल्या आहेत. कोणत्याही वेळी विधानसभा निवडणूक जाहीर झाली तरी बदामराव पंडित यांची मोर्चे बांधणी पाहता विधानसभा निवडणुकीसाठी त्यांनी चांगलीच कंबर कसल्याची दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि भारतीय जनता पार्टीच्या अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला असून काही मातब्बर नेतेही त्यांच्या



संपर्कात आल्याची माहिती मिळत आहे. यामुळे विधानसभा निवडणुकीत चांगलीच रंगत येणार असून बदामराव पंडित यांच्या अंगावर आमदारकीचा गुलाल उधळण्यासाठी कार्यकर्ते ही कामाला लागल्याचे दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर दिनांक १२ सप्टेंबर २०२४ रोजी विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते तथा शिवसेना नेते आमदार अंबादास दानवे यांनी बदामराव पंडित यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देऊन त्यांच्या सोबत निवडणुकी बाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी जिल्हा परिषदचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, शिवसेना उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे, तालुकाप्रमुख अजय दाभाडे यांची उपस्थिती होती. विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांच्या गेवराई भेटीने शिवसैनिकांमध्येही उत्साह संचारला असून, गोरगरिबांसाठी हक्काचं नेतृत्व असलेल्या बदामराव पंडित यांना आमदार करण्यासाठी आम्ही जिवाचं रान करू असा शब्दही यावेळी शिवसैनिकांनी दिला आहे.

# विज्ञान आणि अध्यात्म यामुळे विश्वातील ज्ञान मिळते -प्रा.डॉ.अश्विन झाला

## यो.शि.संस्था कर्मचारी गणेशोत्सव व्याख्यानमाला

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

**अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड घातल्याचे सर्वत्र दिसते कारण विज्ञान व अध्यात्म यांच्याव्दारे विश्वातील ज्ञान होऊ शकते विज्ञान विश्लेषण तर अध्यात्म संश्लेषण करते असे मत जळगांव येथील प्रा.डॉ.अश्विन झाला यांनी व्यक्त केले योगेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी गणेशोत्सव व्याख्यानमालेत ते बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक एल.जी.वैद्य होते.**

पुढे बोलताना प्रा.झाला म्हणाले की, विज्ञान सांगते की मानवाच्या मनात साठ हजार विचार येतात पण या विचारांपैकी किती विचारांचा संकल्प होतो ही ज्याची त्याची धारणा आहे मानवी शरीर आहे तो पर्यंतच अध्यात्म आणि विज्ञान राहणारच आहे विज्ञान बाहय प्रमाणाने तर अध्यात्म आंतरिक प्रतीतीने शोध घेते विज्ञानाने अनेक गोष्टी सिद्ध केल्यात तर बऱ्याच गोष्टी सिद्ध नाहीत असा एक समज आहे पण सर्वच जण त्या नियंत्रणासाठी प्रयत्नशिल असतात त्याचा त्या त्या वेळी परिणामही दिसतो असेही प्रा.झाला म्हणाले पाहुण्यांचे स्वागत प्राचार्य पी.आर. थारकर यांनी केले प्रास्तविक व संचालन प्रा.रमेश सोनवळकर यांनी केले. यावेळी संस्था पदाधिकारी, संचालक, कर्मचारी उपस्थित होते.

# राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष खा.शरदचंद्र पवार यांच्याकडून राजेसाहेब देशमुख यांच्या कार्याची दखल

## महाविकास आघाडीकडून राजेसाहेब देशमुख यांचे नांव आघाडीवर



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख हे गुरूवार, दिनांक १२ सप्टेंबर रोजी खा.शरदचंद्र पवार यांच्या भेटीला सिल्वर ओकवर दाखल झाले व भेट घेतली खा.पवारांच्या भेटीवेळी परळी विधानसभा मतदारसंघाचे अनुषंगाने चर्चा झाली. महाविकास आघाडी म्हणूनच आम्ही निवडणुकांना सामोरे जाणार आहोत. काँग्रेसला ही जागा मिळावी अशी आम्हाला अपेक्षा राहील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा.शरदचंद्र पवार यांनी बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांच्या सातत्यपूर्ण प्रभावी कामगिरी व कार्याची दखल घेतली. यावेळी बीड जिल्ह्यासह परळी विधानसभा मतदारसंघाचा आढावा आणि अहवाल जाणून घेतला महाविकास आघाडीकडून देशमुख यांचे नांव सध्या आघाडीवर आहे. पवार यांनी बीड जिल्ह्यातील राज्यातील बदलत्या राजकीय समिकरणाचे बीड जिल्ह्याच्या राजकारण आणि समाजकारणावर काय परिणाम होतील. तसेच बीड जिल्ह्यासह परळी विधानसभा मतदारसंघातील राजकीय स्थितीचा सविस्तर आढावा घेतला. मागील काही दिवसांपासून जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांचे नांव परळी विधानसभा मतदारसंघातून एक सक्षम उमेदवार म्हणून आघाडीवर आहे यावेळी शंभुराजे देशमुख यांची उपस्थिती होती. देशमुख यांनी परळी विधानसभा मतदारसंघातून आगामी विधानसभा निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर केलं आहे.

# सहावी पर्यंतच्या वर्गासाठी महिला शिक्षक आणि कर्मचारी नेमा

## बदलापूर घटनेनंतर शिक्षण विभागाचा आदेश.

बदलापूर अत्याचार प्रकरणानंतर शिक्षण विभागाने कठोर पावलं उचलण्यास सुरुवात केली आहे. शाळेमध्ये नव्याने शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी भरती होणाऱ्यांसाठी आता पोलिसांच्या दाखल्याची सक्ती करण्यात आली आहे.या संदर्भातील आदेश शिक्षण विभागाकडून पारित करण्यात आला आहे. त्यामुळे नव्याने भरती होणाऱ्या शिक्षकांचे पोलीस व्हेरिफिकेशन होणार आहे. त्यामुळे आता शिक्षकांनी कामावर रुजू होताना त्यांच्या चारित्र्याचा, त्यांच्यावर गुन्हे दाखल नसल्याचा दाखला पोलिसांकडून आणणं बंधनकारक असणार आहे. बदलापूर अत्याचार घटनेनंतर शिक्षण विभागाने हा निर्णय घेतला आहे. यासोबत सहावी पर्यंतच्या वर्गात शिक्षक आणि कर्मचारी शक्यतो महिला नेमण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

बदलापूर येथील एका नामांकित शाळेत दोन चिमुकल्या मुलींवर झालेल्या अत्याचाराचे पडसाद राज्यभरात उमटले आहेत. शाळेतील एका सफाई कर्मचाऱ्याने दोन चिमुकल्यांवर लैंगिक अत्याचार केले. यानंतर राज्यभरातील अनेक शाळांमध्ये खबरदारी घेतली जात आहे. शिक्षण विभागाकडून आता राज्यातील शिक्षकांना पोलीस व्हेरिफिकेशन सक्तीचे करण्यात आलं आहे. त्यामुळे पोलीस ठाण्यात दाखला घेण्यासाठी शिक्षकांची धावपळ सुरु झाली आहे.राज्यभरात अनेक ठिकाणी शाळा-महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी आणि विद्यार्थीनींसोबत अनेक घृणास्पद प्रकार घडल्याचे समोर आलं आहे. शिक्षकी पेशाला काळिमा फासण्याच्या घटना समोर आल्याने पालकांकडूनही चिंता व्यक्त केली जातेय. त्यामुळे आता भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून राज्याच्या शिक्षण विभागासोबत शाळा व्यवस्थापनाकडूनही खबरदारी घेण्यात येत आहे. त्यामुळे शाळांमध्ये शिक्षक आणि



**काय म्हटलंय आदेशात?**

- ※ नव्याने भरती झालेल्या शिक्षकाला पोलिसांचे व्हेरिफिकेशन बंधनकारक
- ※ शाळेतील स्वच्छता कर्मचाऱ्यांनाही पोलिसांचे व्हेरिफिकेशन बंधनकारक
- ※ शाळेतील चालकांनाही चारित्र्य प्रमाणपण सादर करणे अनिवार्य
- ※ सर्व सरकारी आणि खासगी शाळांना हे नियम लागू असणार
- ※ सहाव्या वर्गापर्यंत शक्यतो शिक्षक आणि कर्मचारी महिलाच नेमाव्यात
- ※ सर्व शाळांनी महिनाभरात सीसीटीव्ही बसवावेत, ठराविक वेळेत तपासावेत
- ※ सीसीटीव्हीची तपासणी ही मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापनाची जबाबदारी
- ※ शाळेत तक्रार पेटी लावावी आणि तक्रार असेल तर तात्काळ कारवाई करावी

शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पोलीस व्हेरिफिकेशन सक्तीचे करण्यात आलं आहे. शिक्षकावर आतापर्यंत कोणता गुन्हा दाखल आहे का, त्याची वर्तणूक कशी आहे याची माहिती असलेला पोलिसांचा दाखला सक्तीचा करण्यात आला आहे. यामध्ये महत्त्वाची बाब म्हणजे महिला शिक्षकांनाही अशा प्रकारचा दाखला द्यावा लागणार आहे.

# अहंकार मुक्त निस्वार्थ हेतूने केलेले दान सर्वश्रेष्ठ-भन्ते धम्मशील थेरो

## आईच्या तृतीय स्मृती दिनी डॉ. सुनील सरवदे यांनी विहिर बांधून लोकार्पण केले

बीड ।प्रतिनिधी

माणसाने माणसाशी कसे वागावे ही शिकवण देणारा धम्म म्हणजे तथागतांचा महान उपदेश होय. त्या धम्मामध्ये दानाला अनन्य साधारण महत्व आहे. अहंकारमुक्त, निस्वार्थ हेतूने केलेले दान सर्वश्रेष्ठ आहे. असे प्रतिपादन पुज्य भन्ते धम्मशील थेरो यांनी केले.

डॉ.भदन्त आनंद कौशल्यायन नगर मौजे शिवणी ता.जि.बीड येथे प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्थे करता डॉ.सुनील सरवदे नाशीक यांनी आपल्या आईच्या तृतीय स्मृती दिनी दान पारमितेचे पालन करुन संस्थेकरीता ११ लाख रुपये खर्च करुन बांधलेल्या विहिरीचा लोकर्पण सोहळा आयोजित केला होता. या प्रसंगी भन्ते धम्मशील थेरो यांनी विधिवत पूजन करुन बीडचे आमदार संदीपभैय्या क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम, संस्थेचे सदस्य, शिवणी ग्रामस्थ व सरवदे परिवारातील नातेवाईकांच्या उपस्थितीत विहिर लोकार्पणाचा सोहळा संपन्न झाला. सामुदायिक त्रिशरण-पंचशील नंतर डॉ.सुनील सरवदे कुटूंबीयांचा सरपंच मौजे शिवणी अजय सुपेकर व विहिर बांधकामाची संपूर्ण जबाबदारी सांभाळणारे उपा.अंकुश डोळस यांचा संस्थेतर्फे हृदय सत्कार करण्यात आला. पुज्य भन्ते पुढे म्हणाले की, या विहिरीच्या पाण्याने मौजे शिवणी तसेच संस्थेच्या पाण्याची गरज पूर्णत्वास जात आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.राम गायकवाड यांनी केले तर संस्थेचे उपाध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे यांनी प्रास्ताविक व मनोगत व्यक्त करुन संस्थेची सद्य परिस्थिती व पुढील नियोजनाबद्दल सविस्तर माहिती देतांना संस्थेचे अध्यक्ष पुज्य डॉ.उपगुप्त महाथेरो (पूर्णा) यांच्या मार्गदर्शनाखाली भिक्खु धम्मशील थेरो करीत असलेल्या कार्यामुळे बीड शहरातच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यात दान पारमितामध्ये वृध्दी होऊन जगाला शांतीचा मार्ग दाखविणार्या धम्माचा प्रचार व प्रसार होत आहे. जो कोणी त्रिशरण, पंचशील, आर्य आष्टांगिक मार्ग व दहा पारमितेचे पालन करुन जीवन जगतो तो नक्कीच कुशल कर्म करण्यास सतत तत्पर असतो असे स्पष्ट केले. डॉ.सुनील सरवदे यांच्यावर बालपणापासून त्यांच्या आई-वडीलांनी केलेल्या तथागतांच्या उपदेशाचा, फुले-शाहू-आंबेडकर विचारांचा संस्कार मनावर बिंबवला. त्याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे ११ लाख रुपये खर्च दान करुन आजचा विहीर लोकार्पण सोहळा होय हे नमुद करुन डॉ.सुनील सरवदे यांची दान पारमिता इतरांकरीता प्रेरणादायी आहे असे निक्षुण सांगितले. डॉ.सुनील सरवदे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, आई-वडीलांनी बालपणापासून



उपसलेले अपार कष्ट, माता रमाई व उच्च विद्याविभूषीत डॉ.बाबासाहेबांनी समाजाकरीता व देशाकरीता केलेला त्याग सांगितला व आपण देखील समाजाचे काही देणे लागतो या भावनेतून हे दानकर्म केले; यातून कुशल कर्म करण्याच्या प्रवृत्तीत वाढ होऊन दुसर्याच्या आनंदासाठी, सुखाकरीता अल्पप्रमाणात का होईना कारणी लागता आले यातून समाधान मिळते, यातच संपूर्ण कुटूंबाचा आनंद आहे असे भावपूर्ण उद्गार आपल्या आईच्या स्मृतीदिनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कोषाध्यक्ष भास्कर सरपते यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास संस्थेचे बहुसंख्य सदस्य, मौजे शिवणी ग्रामस्थ व बीड परिसरातील उपासक, उपासिकांची उपस्थिती होती. डॉ.सुनील सरवदे परिवारातर्फे भोजनादन करण्यात येऊन पुज्य भन्तेजींच्या गाथेने व सरणात्तयने कार्यक्रमाची सांगता झाली.

# बोंबला.. माजलगाव तहसील कार्यालयात पिण्याचे, पाणी स्वच्छतागृहच नाही

## अपंग, वयोवृद्ध, गर्भवती महिला यांची हेळसांड थांबवावी भाई ॲड.नारायण गोले पाटील

माजलगाव ।प्रतिनिधी

तालुक्याच्या सर्व कार्यालयाचे वरिष्ठ कार्यालय म्हणून तहसील कार्यालयाकडे पाहिले जाते, मात्र माजलगाव तहसील कार्यालयात हजारो नागरिक दररोज उंबरे झिजवत असताना तहसील कार्यालयात कुठलेच काम होत नाही याशिवाय वयोवृद्ध नागरिक अपंग आणि गर्भवती महिला हे देखील संजय गांधी निराधार इंदिरा गांधी निराधार योजनेच्या विविध कामासाठी तहसील कार्यालयाचे उंबरे झिजवत असताना तहसील कार्यालयात दिवस ठाण मांडून बसतात पण तहसीलदार यांना त्यांच्यासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावीशी वाटली नाही याशिवाय मुतारी संडास बाथरूम यांचा अभाव तहसील कार्यालयात असल्याने शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला असून तहसीलदार यांनी १७ सप्टेंबर पूर्वी तहसील कार्यालयात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी महिलांसाठी अपंगासाठी, वयोवृद्धांसाठी ,पुरुषांसाठी स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात यावी याशिवाय तहसील कार्यालयात चाललेली अधिकारी



कर्मचारी यांची मनमानी थांबवावी तहसील कार्यालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी मुख्यालय वास्तव्यास थांबावे, तसेच तहसील कार्यालयात चाललेला भ्रष्टाचार थांबवून सामान्य नागरिकाची कोळंबून पडलेली कामे त्वरित करण्यात यावीत आदी मागण्याचे दहा सप्टेंबर रोजी तहसीलदार माजलगाव यांना निवेदन दिले यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड नारायण गोले पाटील यांनी तहसीलदार यांनी वृद्ध अपंग व गर्भवती महिला यांच्यासह नागरिकांची हेळसांड थांबवावी अन्यथा १७ सप्टेंबर पासून तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला असून या निवेदनावर शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती समिती सदस्य भाई ड नारायण गोले पाटील,तालुका चिटणीस भाई मुंजा पांचाळ तालुका सह चिटणीस भाई राहुल सोळंके, भाई सतीश शेजुळ पुरोगामी युवक संघटनेचे तालुका अध्यक्ष भाई अशोक कुलकर्णी भाई चांगदेव शेजुळ भाई आनंत चव्हाण, भाई विष्णू शेळके भाई सुदाम चव्हाण भाई गोविंद घाटूळ भाई माऊली चंदनशिव आदींच्या स्वाक्षरी आहेत


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT